# महाराष्ट्र शासन

क्र.विसआ-२०१७/प्र.क्र.६७/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
दालन क्र.४४१,मंत्रालय (विस्तार),
चौथा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ जून, २०१७.

प्रति,

१.सर्व कुलगुरू,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२.संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००१.

विषय :-आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याबाबत

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३.१०.२०१६ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरिता पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रू.६.०० लक्ष करण्यात आली आहे.

२. त्यानुषंगाने पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात आले असून सदर ईबीसी सवलतीसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर यादीचे अवलोकन केल्यानंतरच विद्यार्थ्यांची पात्रता ग्राहय धरण्यात यावी. संस्थास्तरावर छाननी करून विद्यार्थी अपात्र असल्याबाबत निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यापासून वंचित ठेवण्यात येऊ नये. तथापि, उपरोक्त यादीनुसार विद्यार्थी अपात्र आढळल्यास त्याच्याकडून संबधित विषयाचा निकाल घोषित करण्यापूर्वी उर्वरीत प्रवेश शुल्काची वसूली करण्यात यावी.

4817
- 3 JUL 2017

c:\users\manoj.kale\desktop\manoj\पत्र.docx

३. वरीलप्रमाणे स्पष्ट सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील/अधिपत्याखालील सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्यात याव्या.

(म.मा.मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीस्तव सादर अग्रेषित-

१.प्रधान सचिव(कृषी व पदुम विभाग), मंत्रालय, मुंबई

२.प्रधान सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१

प्रत:-

१.सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये.

२.कक्ष अधिकारी(तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी/2017/ 1823**
**सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,**
**नागपूर.**
**दिनांक : - 4 JUL 2017**

**प्रत :** प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीकरीता. त्यांना कळविण्यांत येते की, सदरहू शासन पत्रात नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.